# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र. ३४-२२ दिनांक ०२/०२/२०२२

## १६ वर्षाच्या मुलीसह तीन पिडीत मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका

दिनांक ०१.०२.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध नालासोपारा पथकाचे पोनि एस एस चौधरी यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील वालीव पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात वेश्यादलाल महिला वय ४० वर्षे रा. मुंब्रा ठाणे ही ग्राहकांना मुली पुरवून वेश्या व्यवसाय चालविते व त्यावर आपली उपजिवीका करतात

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक पोनि एस एस चौधरी यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना मुंबई अहमदाबाद हायवे रोड वरील ससुपाडा गावच्या हद्दीत जीएन मॉटेल हॉटेल या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा टाकला असता महिला दलाल सलमा शेख हि वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने सदर बाबत पोहवा/राजेश निवृत्ती पद्मने यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने आरोपी सलमा शेख रा. मुंब्रा ठाणे यांचे विरुध्द वालिव पोलीस ठाण्यात १२७/२०२२ भादंविस कलम ३६६ (अ),३७०,३७० (अ),(१)सह पिटा कायदा कलम ४,५ व बालकांचे लैगिक अत्याचारांपासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,१६,१७,१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/संतोष सोपान चौधरी तसेच सफौ/बारकु दगा चित्ते,पोहवा/राजेश निवृत्ती पद्मने,मपोहवा/सुनिता जॉन कांटेला,पोना/रोशन नारायण किणी,पोना/विशाल धोंडीराम कांबळे,पोना/महेंद्र पुंडलिक शेटये,मपोशि/काजल प्रदीप पाटील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांनी केली आहे.

---ooo--